राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed through State Government) खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनी लोन सहकारी साखर कारखान्यांना उपलब्ध करुन देणेबाबत- मा. मंत्री समिती व तांत्रिक- आर्थिक छाननी समिती गठित करणे.

महाराष्ट्र शासन

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र.ससाका-२०१९/प्र.क्र.८०/३-स
मंत्रालय, सहावा मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दि. ०५ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :- १. साखर आयुक्त यांचा प्रस्ताव दि. २५.४.२०१९, दि. १४.६.२०१९, दि. २६.६.२०१९, दि.२७.६.२०१९, दि. २८.६.२०१९ व दि. १६.७.२०१९
२. मा. मंत्रीमंडळाच्या दि. २८.०८.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed through State Government) खेळत्या भाग भांडवलासाठी मार्जिन मनी लोन योजनेतंर्गत, सहकार शिरोमनी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना लि., चंद्रभागा नगर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर, श्री.तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि, वारणानगर ता. पन्हाळा जि. कोल्हापूर , भिमा सहकारी साखर कारखाना लि. टाकळी सिकंदर, ता.मोहोळ, जि.सोलापूर व वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता.परळी, जि.बीड या चार सहकारी साखर कारखान्यांनी अर्थसहाय्य मिळणेची विनंती केली होती.

साखर कारखांन्याकडून यापुढे प्राप्त अर्थसहाय्याच्या प्रस्तावाची आर्थिक व तांत्रिक छाननी करण्यासाठी समिती गठीत करणे, या समितीच्या छाननीचे अनुषंगाने प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या निर्णयार्थ सादर करण्याची शिफारस करण्यास्तव मा. मंत्री समिती गठीत करणे. याबाबतच्या प्रस्तावावर मंत्रीमंडळाच्या दि. २८.०८.२०१९ च्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

१. राष्ट्रीय सहकार विकास निगम यांच्याकडून राज्य शासनामार्फत कर्ज उपलब्ध करून देण्यासाठीची साखर कारखान्याकडून वेळोवेळी प्राप्त होणारी मागणी पाहता सदर अर्थसहाय्य मिळणेबाबतच्या भविष्यात प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाची तांत्रिक व आर्थिक छाननी साठी शिफारशीचे निकष ठरविण्यासाठी तसेच प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची तांत्रिक व आर्थिक छाननी करण्याकरिता साखर आयुक्त,

पुणे यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक व आर्थिक छाननी समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

अ) तांत्रिक छाननी समितीची रचना-

१. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे	अध्यक्ष
२. वसंतदादा शुगर इंस्टिटयुट यांचे प्रतिनिधी	सदस्य
३. साखर संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, म.रा.पुणे	सदस्य
४. साखर संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, म.रा.पुणे	सदस्य
५. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या., मुंबई यांचे प्रतिनिधी	सदस्य
६.सहसंचालक (उपपदार्थ), साखर आयुक्तालय, म.रा.पुणे	सदस्य
७. संबंधित साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक	सदस्य
८. कार्यकारी अभियंता साखर आयुक्तालय, म.रा.पुणे	सदस्य सचिव

ब) आर्थिक छाननी समितीची रचना

१. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे	अध्यक्ष
२. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रतिनिधी	सदस्य
३. साखर संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, म.रा.पुणे	सदस्य
४. साखर संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, म.रा.पुणे	सदस्य
५. सह निबंधक (लेखापरीक्षक) साखर आयुक्तालय, म.रा.पुणे	सदस्य
६. संबंधित साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक	सदस्य
७. सहसंचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, म.रा.पुणे	सदस्य सचिव

तांत्रिक व आर्थिक समितीमध्ये आमंत्रित सदस्य बोलविण्याचे अधिकार साखर आयुक्त यांना देण्यात येत आहे.

२. उपरोक्त तांत्रिक व आर्थिक समितीने छाननी करुन सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने मा. मंत्रीमंडळाच्या निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्यास्तव शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे मंत्री समिती गठित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. मा. मंत्री (वित्त व नियोजन)	अध्यक्ष
२. मा. मंत्री (सहकार)	सदस्य
३. मा. राज्यमंत्री (सहकार)	सदस्य
४. साखर आयुक्त	सदस्य सचिव

३. सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दि. २८.०८.२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३४०/२०१९/ व्यय-२, दि. १९.०७.२०१९ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९०६१४३४१२३२०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरी करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d09609003b414273f73, serialNumber=8ff188a569f4a95d2f0ce8ca61e60d8aa5f51a1bf65b42dd49bb26d165941d9e, cn=Sudin Gaikwad
Date: 2019.09.06 16:03:00 +05'30'

(डॉ.सुदिन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल महोदय यांचे खाजगी सचिव,
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विधान परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई
७. सर्व विधान सभा सदस्य, विधान मंडळ, मुंबई
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
११. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे १०.
१२.सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर)
१३.महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१४.महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर.
१५.वसंतदादा शुगर इंस्टिट्युट यांचे प्रतिनिधी
१६.महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या., मुंबई
१७.निवड नस्ती (३-स)